IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 4, Issue 1, April 2021

# आपत्ती व्यवस्थापनामध्ये स्वयंसेवी संस्था व समाजकार्यकर्त्यांचे योगदान

**डॉ. प्रविण कोहळे**
मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय नरखेड
pravinkohale67@gmail.com

**सारांश :**

आपत्ती निवारणाच्या वेळी अनेक नोंदणीकृत किंवा अनोंदणीकृत स्वयंसेवी संस्था आपाद व्यवस्थापना साठी सर्व आवश्यक साधन सामुग्री सह मदत कार्यासाठी येतात. अशा स्वयंसेवी संस्था आणि खाजगी किंवा व्यक्तिगत मदतगार लोकांचा सुसुत्र उपयोग करून मदतकार्य, राहतकार्य आणि पुनर्वसनासारख्या अनेक गोष्टी त्यांच्याकडून करून घेता येतात. आपाद आघातांमध्ये फक्त मदतकार्यच कामाचे नसते तर मदतीचा हिशोब आणि कामकाजाच्या नोंदी बनवणे सुद्धा तितकेच महत्वाचे असते. यामुळे ज्या लोकांपाशी मदतीसाठी पर्याप्त धनराशी आहे पण काम करायला स्वयंसेवक नाहीत अशांच्या विश्वासाला या स्वयंसेवी संस्था व स्वयंसेवक पात्र ठरतात.

## उद्देष

- आपत्ती व्यवस्थापनामध्ये स्वंयसेवी संस्थांची भुमिका अभ्यासणे.
- स्वंयसेवी संस्थां आणि सामाजिक कार्यकर्ता यांचे सहसंबध अभ्यासणे

## उपकल्पना

- आपत्ती व्यवस्थापनामध्ये स्वंयसेवी संस्थांची भुमिका महत्वपुर्ण आहे
- सामाजीक कार्यकर्ता, स्वंयसेवी संस्था आणि षासन यामधील सामाजिक कार्यकर्ता हा महत्वपुर्ण घटक आहे.

## प्रषिक्षण स्तर

प्रतिसादात्मक कारवाई आणि प्रतिक्रिया

- प्रतिक्रियात्मक कारवाईसाठी लागणाऱ्या लोकांची आणि साधनसामुग्रीची जमवाजमव
- शोध आणि बचाव कार्याचे सुसत्र संचालन
- लोक जागृती
- अपघातग्रस्त जागांमधून लोकांना हालविणे.

## पुनर्निर्माण

- सतत वैद्यकीय मदत (हॉस्पिटलपर्यंत जाण्याची वेळ)
- पुनर्रचना

- पुनर्वसन
- आपदा निवारणात्मक कारवाई संबधी लोकजागृती कार्यक्रम राबवणे
- संकट मोचन कार्यपद्धती

**मानसिक ताण कमी करण्याची प्रक्रिया**

- वर्गीकरण
- जनजागृती
- आर्थिक पूरवठा

**पूर्वतयारी**

- आपाद निवारण परियोजना
- प्रषिक्षण
- सिनेरियो वर्किंग

**समाजकार्यकर्त्यांचे प्रषिक्षण**

- असुरक्षित वस्तुचा षोध घेऊन त्यांच्या सुरक्षेची काळजी
- छोटया छोटया आगींना विझवणे
- मोठया जखमांवर तज्ञ डॉक्टर्स येईपर्यंत मलमपटटी करणे
- लहान प्रमाणावर षोध आणि बचाव कार्याची सुरवात व पारंगत व्यक्ती आल्यावर त्यांना परिस्थितीची माहीती देणे.
- आपदग्रस्त लोकांचा मानसिक ताणतणाव दूर किंवा कमी करणे.

**उपाययोजना**

- हॉस्पिटलमध्ये आपाद विमोचन समितीची स्थापना करून तेथील कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण. या समितीची रचना खालीलप्रमाणे असावी.
- सरकारचे वैद्यकीय प्रतिनिधी
- हॉस्पिटल चे मुख्य प्रबंधक
- कर्मचारी आणि नर्सेसचे प्रतिनिधी
- स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी
- आजुबाजूच्या खाजगी नर्सिंग होमचे प्रतिनिधी
- सरकारचे प्रशासकीय प्रतिनिधी

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 4, Issue 1, April 2021

**निम्नलिखित वैद्यकीय विशेषज्ञाची सोय करणे.**

- आपादग्रस्तांसाठी ऑर्थोपिडिक सर्जन तुटलेली हाडे जोडण्यासाठी,
- शल्यचिकित्सक – मलब्याखालून लोकांना काढतांना शरीराचा अवयव कापावा लागतो.
- महिला प्रसुती विशेषज्ञ गर्भवती बायकांवर वेळ आलीच तर प्रसुती शस्त्रक्रिया करण्यासाठी
- मनोवैज्ञानिक तज्ञ आणि योगकेंद्र, आपादग्रस्तांच्या व मदतकर्त्यांच्या मानसिक तणावाला दूर करण्यासाठी.

वरील प्रमाणे विचार व कारवाई झाल्यानंतर वैद्यकीय उपचाराबरोबरच खालील गोश्टींचा विचार करून त्यांना अमलात आणणे हॉस्पिटलची आवष्यकता ठरते.

- तंबू मध्ये चालणाऱ्या फिल्ड हॉस्पिटलची तयारी करणे.
- जीवनरक्षक आणि इतर औशधींचा साठा करणे.
- कर्मचाऱ्यांसाठी आणि रूग्णांसाठी जेवण, कपडे, पाणी षौचालय यांचा प्रबंध करणे.

**समाज कार्यकर्त्याचे प्रशिक्षण**

कुठलाही नागरिक जेंव्हा स्वयंभावी वृत्तीने आपादकालामध्ये स्वतःहून मदत कार्यात सहभागी होतो आणि आपादग्रस्त भागामध्ये शोध बचाव व मदत कार्यामध्ये आपले योगदान देतो त्याला स्वयंसेवक म्हणतात. स्वयंसेवकाला ज्या वेळी जबाबदारी देण्यात येते त्या वेळी तो कुरकुर न करता आपादग्रस्त भागामध्ये जाऊन कार्यरत होतो. प्रत्येक स्वयंसेवकामध्ये पिडित लोकांना मदत करण्याची आंतरिक ऊर्मी असणे आवशयक आहे. त्याचप्रमाणे कमीतकमी वेळात जास्तीत जास्त निरीक्षण व आढावा घेऊन शारिरिक व मानसिक तणावाखाली काम करण्याची क्षमता ही स्वयंसेवकात असली पाहिजे. स्वयंसेवकाचे काम जोखीमीचे व कष्टकारक तर असतेच पण पडणाऱ्या मानसिक तणावानंतर एक सकारक आव्हान स्विकारल्याचे समाधानही स्वयंसेवकाला मिळते.

स्वयंसेवक आपदा आघातानंतर लगेच कामाला लागतात. त्यांना आपाद निवारणाच्या मुख्य योजना, तांत्रिक मदत किंवा प्रशासकीय कार्य या पैकी कुठलीही जबाबदारी दिली जाऊ शकते. पुर्वानुभवा वरून हा प्रत्यय येतो की प्रत्येक स्वयसेवकाला किमान चार आठवडे कार्यरत असायची सवय असली पाहिजे. स्वयंसेवकामध्ये सामान्य स्वयंसेवक, अनुबंधित प्रशिक्षित स्वयंसेवक, प्रशिक्षित वित्तिय स्वयंसेवक, तांत्रिक प्रशिक्षित स्वयंसेवक, वैद्यकीय क्षेत्रातील स्वयंसेवक, पत्रकार स्वयंसेवक आणि मृतदेह आणि मृत जनावरांची विल्हेवाट लावणारे स्वयंसेवक असे विविध प्रकार असतात. कुठलाही सामान्य स्वयंसेवक प्रशिक्षण घेऊन प्रशिक्षित स्वयसेवक बनू शकतो.

**समाजकर्त्याचे योगदानः** प्रत्येक स्वयंसेवक वैयक्तिकरीत्या शोध आणि बचाव कार्यामध्ये योगदान देऊ शकतो. त्यासाठी तो मनुष्य खालील बाबींमध्ये प्रशिक्षित असणे जरूरी असते.

- आपादग्रस्त भागामधील जीव व वित्तहानी व जोखमींचा आढावा घेऊ अधिकाऱ्यांपर्यंत पोचवणे.
- वरील हानींचा फक्त अंदाजच न घेता तथ्य (फॅक्टस) शोधा.
- पुढे काय होऊ शकेल व तुम्ही त्याला कसे तोंड होऊ शकाल याचा सतत विचार करीत राहा.
- स्वतःच्या परिस्थितीचा, जोखिमेचा आणि जबाबदारीचा सतत आढावा घेत राहा आणि सहनशीलतेचे मूल्यांकन करीत राहा.
- काम करण्याच्या प्राथमिकता (प्रॉयॉरिटिज) ठरवा व त्या प्रमाणे कार्यारंभ करून काम करीत रहा.
- त्वरीत निर्णय क्षमता अंगी बाळगा.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 4, Issue 1, April 2021

- आपल्या कारवाईचा ढोबळ आराखडा ठरवूनच कार्यारंभ करा अ कार्ययोजने प्रमाणेच प्रगती करा.
- केलेल्या कामाच्या प्रगतीचे मूल्यांकन करा.

**समाजकार्यकर्त्याच्या मानसिक अवस्था**

- वीरोचीत अवस्था : आपाद आघातानंतर लोकांना वाचवणे व त्यांना आवश्यक ती मदत करणे, याच एका भावनेतून ही अवस्था निर्माण होते. आपल्या नोकरी धंद्याची काळजी न करता सामाजिक कार्य करणे हेच स्वयंसेवकाचे ध्येय असते.
- मोहभंग : ज्या वेळी मदत आणि निवारण मनाप्रमाणे होत नाही आणि सर्व काही पुर्वस्थिती वर यायला फार वेळ लागतो, आपादग्रस्त बरोबर पाहिजे तसा प्रतिसाद देत नाहीत, त्या वेळी ही अवस्था निर्माण होते आणि काम सोडून निघून जाण्याची मानसिक स्थिती व उर्मी तयार होऊ लागते.
- पुनर्रचना आणि पुनर्लाभ : जर या पर्यंत स्वयंसेवक टिकलाच तर कामासाठी पुर्नर्जीम निर्माण होऊन पुनर्वसनाचे काम सुलभ होऊ लागते.

**संदर्भ ग्रंथ :**

1. मगर जयकुमार ''पर्यावरणषास्त्र परिचय'' विद्या प्रकाषन, नागपूर 2005
2. पटवर्धन बालकृश्ण ''आपत्ती व्यवस्थापन'' नचिकेत प्रकाषन, नागपूर, 2011